# कुलवृत्तान्त मार्गदर्शन

भारताला स्वातंत्र्य मिळून पंचावन्न वर्षे होऊन गेली. परंतु भारतीय समाजात असलेली घराणी, जाती, धर्म, पंथ यांनी स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामी जे योगदान दिले त्याची कोठेतरी नोंद घेणे आवश्यक वाटते.

प्रत्येक घराण्यातील शाखांची व्यक्तिगत माहिती कळल्यास घराण्याचा नावलौकिक कसा वाढला ते समजू शकेल. प्रत्येकजण आपल्या आयुष्यात जी काही धडपड करतो त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित होत असते. त्यास आपण कर्तबगारी, पराक्रम किंवा चारित्र्य असे म्हणतो. एकमेकांच्या चारित्र्यामुळे आपण अधिक कर्तबगार कसे होऊ हे पहाणे या कुलवृत्ताच्या निमित्ताने पुढे येईल, यात शंका नाही.

कुलवृत्तामुळे व्यक्ती आणि कुल उत्कर्ष, शैक्षणिक मदत, रुग्ण, अपंगांना वैद्यकीय मदत, विवाहासंबंधी वधुवर संशोधन आणि नोकरीसाठी शिफारस व खटपट या गोष्टी ट्रस्टच्या माध्यमातून फारशी आर्थिक जबाबदारी व्यक्तिवर न पडता सहजासहजी एकमेकांच्या स्नेहामधून घडू शकले अशी खात्री वाटते. अशा अनेक सुसंस्कारित घरांतून मोठा समाजगटही सुसंस्कृत झाला, तर राष्ट्राच्या दृष्टीने ते उपकारकच म्हणावे लागेल.

ज्या कऱ्हाडे ब्राह्मणांना आपल्या घराण्याचा कुलवृत्तांत लिहावयाचा असेल तर पुढील मुद्दे लक्षात घेऊन त्यावर संशोधन करावे.

१) घराण्यासंबंधी नमुना प्रश्न
२) इ. स. १६०० ते २००० या कालखंडातील इतिहास
३) एकूण १५ पिढ्यांचा हा इतिहास होतो
४) स्त्री पुरुषांची व्यक्तिगत माहिती
५) साहित्य, वर्तमानपत्रे, घरगुतीपत्रे यांतील संदर्भ
६) ग्रामदैवत, आडनावे यासंबंधी माहिती
७) जात, कुल, गोत्र, प्रवर कुलाचार इत्यादी माहिती
८) संदर्भ ग्रंथ, साहित्य खंड, भारतीय संस्कृती कोष महादेव शास्त्री जोशी, वर्तमानपत्र उल्लेख
९) स्थलांतर
१०) कुलभुषणे (सर्व क्षेत्रातील)
११) कालानुसार व्यवसाय, कला, अधिकारी यांची ओळख
१२) घराण्याची स्वभाव वैशिष्ट्ये, गुणदोष
१३) भारतीय समाजात कालानुसार योगदान
१४) फोटो, देवस्थाने, जमीनजुमला कागदपत्रे सनदा
१५) सामाजिक व आर्थिक दृष्ट्या शतकानुसार आढावा सर्वेक्षण

अ) पुरुष व स्त्रिया संख्या, ब) प्रसिद्ध व्यक्ती, क) व्यावसायिक, ड) कायम वास्तव्य असणारी कुटुंबे त्यांचे पत्ते व ठिकाण, इ) परदेशी वास्तव्य असणारी कुटुंबे, फ) घराण्याच्या शाखा असल्यास शाखावार विभागणी

१६) वंशावळ

माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यंत पुढील कुलवृत्तांत प्रसिद्ध झाले आहेत, ते असे :

श्री. पोतदार, गुण्ये, सरदेसाई, गोळे, आठल्ये, शेजवलकर, वाकणकर मावळणकर अंतर्गत देसाई, लळीत, गोविलकर, देशमुख, शेवडे, जावडेकर, श्रीखंडे, सरपोतदार, नूलकर.

नामुकल अंतर्गत नानिवडेकर, महाजनी, कुलकर्णी इत्यादी.

आपणास कुलवत्तासंबंधी मार्गदर्शन हवे असल्यास कार्यालयात संपर्क साधावा.

●●●